PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Hamal De Dhamal
Year: 1987

Song: Hamal De Dhamal
Lyricist: Vivek Apte

कशासाठी पोटासाठी
खंडाळ्याच्या घाटासाठी
आटापिटा कशासाठी
वितभर पोटासाठी
अरे बजरंगाची कमाल
हमाल दे धमाल
हमाल दे धमाल
हमाल धमाल हमाल धमाल
दूर जरा वाट करा संभाल
फलाटाला लागतीया इंजिनगाडी
आरं फलाटाला लागतीया इंजिनगाडी
तमाकूची पुडी टाका
फेका बिडी काडी
आरं चला चला पटापटा बॅगा बिगा उचला
डोईवर सामानाचा डोंगर बरसला
तयार धंद्याला
करा हो हुकूम बंद्याला
हो बंदा तयार धंद्याला
करा हो हुकूम बंद्याला
हाणा उडी मारा धक्का
ओढा चला धरा पक्का
लावा जोर सोडू नका
घामाचाच तो मिळे पैका
म्हाताऱ्याचं अरं जरा ऐका
बोला बजरंगाची कमाल
हमाल दे धमाल
हमाल दे धमाल
हमाल धमाल हमाल धमाल
दूर जरा वाट करा संभाल

आरं गावोगावी फिरा लेको
मौज मज्जा करा
आरं गावोगावी फिरा लेको
मौज मज्जा करा
तुम्ही हमालपुऱ्यात जगा आणि मरा
आरं हमालानं देऊ नये डोक्याला तरास
डोईवर बोजा तर पोटामधी घास
तयार धंद्याला
करा हो हुकूम बंद्याला
हे बंदा तयार धंद्याला
करा हो हुकूम बंद्याला
नगा मागे हमालीची
बोली होती अधेलीची
नोट दोन रूपयाची
थट्टा हाय गरिबाची
त्याच्या परी देऊ नका पैका
बोला बजरंगाची कमाल
हमाल दे धमाल
आरं हमाल दे धमाल
हमाल धमाल हमाल धमाल
दूर जरा वाट करा संभाल

पुन्हा लावाल बॅगेला हात
ठेवा ध्यानात एकच बात
माझ्या वाटेला गेलात कोणी
असा हाणीन मागाल पाणी
आरं फलाटाला लागतीया इंजिनगाडी
आरं फलाटाला लागतीया इंजिनगाडी
तमाकूची पुडी टाका

फेका बिडी काडी
आरं चला चला पटापटा बॅगाबिगा उचला
डोईवर सामानाचा डोंगर बरसला
तयार धंद्याला
करा हो हुकूम बंद्याला
हे बंदा तयार धंद्याला
करा हो हुकूम बंद्याला
हात लावा दादा थोडा
सामानाची चिंता सोडा
बस टॅक्सी रिक्षा टांगा

कुठं जायचं लवकर सांगा
समजून द्या दादा पैका
बोला बजरंगाची कमाल
हमाल दे धमाल
हे हमाल दे धमाल
हमाल धमाल हमाल धमाल
हमाल दे धमाल
हे हमाल दे धमाल
हे हमाल दे धमाल
हमाल दे धमाल

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*